# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२—२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : rdtenagpur.org.in


अतितात्काळ

कालमर्यादित

क्रमांक : तंशिस/प्राकाना/शै.वि/इ.बी.सी/२०१३/ 3641

दिनांक : 22 OCT 2013

प्रति,

———————————

———————————

———————————

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषय:— **खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेतील व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या ५० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचे ऑनलाईन पध्दतीने भरेलेले अर्ज सादर करण्याबाबत शैक्षणिक वर्ष २०१३—१४**

**संदर्भ:—** तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.१५/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१३/१२८, दि. २१/१०/२०१३

शैक्षणिक वर्ष २०१३—१४ पासून आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या ५० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचे ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. सदर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची अंतिम दिनांक **२१**/१०/२०१३ ठरलेली आहे. सदर ऑनलाईन भरलेले अर्ज संस्थेच्या लॉगिनमधून Approval करुन दिनांक २५/१०/२०१३ पर्यंत खास प्रतिनिधीमार्फत खालील मुददयांप्रमाणे तपासणी करुन या कार्यालयास सादर करावे.

१. ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व त्यासोबत अर्जामध्ये दिलेले प्रमाणपत्र (जसे ॲडमिशन कर्फामेशन लेटर, वर्ष २०१२—१३ चे सक्षम अधिका—यांनी दिलेला कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला रु. १ लक्ष व त्या आत असलेला, मागिल वर्ष पास/एटीकेटी ची मार्कशिट, अधिवासी प्रमाणपत्र, राशन कार्ड व अर्जामध्ये नमुद केलेले इतर आवश्यक प्रमाणपत्र)

२. संस्थेने त्यांच्या **ईबीसी लॉगिन मध्ये असलेला मॅसेज बॉक्स दररोज तपासून पहावा. यापुढे त्या मॅसेज बॉक्सव्दारेच तुम्हाला सुचना देण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

३. अर्जासोबत शिक्षण शुल्क समितीने मंजूर केलेले शिक्षण शुल्काची प्रत (प्रत्येक वर्षाची स्वतंत्र प्रत सादर करावी) आपल्या अर्जासोबत सादर करावी.

४. जे अर्ज Fill New Application Form मधून भरलेले आहे. त्यांच्या अर्जासोबत Admission Conformation Letter जोडणे अनिवार्य आहे. व अश्या अर्जाची स्वतंत्र यादी सुध्दा सादर करावी.

५. जे विद्यार्थी अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमात १२ वी नंतर प्रवेशित आहेत त्या विद्यार्थ्यांकडून ११वी व १२वी कोणती सवलत घेतलेली आहे त्याबाबतचे संबंधीत शाळा/महाविद्यालयाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६. कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिकारी जसे तहसिलदार, नायब तहसिलदार, एसडीओ यांचे असणे आवश्यक आहे.

७. आपल्या संस्थेच्या अर्जासोबत शैक्षणिक वर्ष २०१३–१४ चे हमिपत्र (इबीसी व्यतिरिक्त अन्य कुठलिही सवलत घेतलेली नाही याबाबतचे) सादर करावे. सदर हमिपत्राचा नमुदा या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.rdtenagpur.org.in) उपलब्ध आहे.

८. प्रस्तावासोबत आपल्या संस्थेच्या बॅंक खात्याची बिनचुक माहिती विहित नमुन्यात स्वाक्षरी करुन व बॅंकेव्दारे प्रमाणित करुन सोबत जोडावी. याआगोदर सादर केली असल्यावरही त्याची छायांकित प्रत प्राचार्याच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन दिनांकासह सादर करावी.

९. फक्त ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्जच सादर करावे.

१०. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जासोबतची सर्व कागदपत्रे सांक्षाकित असणे आवश्यक आहे. नसल्यास सदर अर्ज रद्द करण्यात येईल.

**वरील बाबींची पुर्तता सर्व विद्यार्थ्यांनी केली असल्याबाबतची खात्री करुन व संस्थास्तरावरच अर्जाची छाननी करुन फक्त ऑनलाईन भरलेले अर्जच या कार्यालयास सादर करावे. अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयास सादर करु नये. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अर्जावर प्राचार्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. अन्यथा आपले संस्थेचे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

प्रत:— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना वेबसाईडवर अपलोड करण्याकरीता

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


क्रमांक:१५/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१३/ 92८

दिनांक : 21 OCT 2013

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत (संगणक प्रणाली द्वारे ऑनलाईन अर्जाबाबत )

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती योजनेची (ऑनलाइन) संगणकीय प्रणालीवर संस्थांनी विद्यार्थ्यांची माहिती दिनांक १६/१०/२०१३ पर्यंत अर्ज भरण्याबाबत अंतिम मुदत देण्यात आली होती, त्यानंतर संबंधित संस्थांनी संस्थास्तरावर लाभार्थी विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करुन ॲप्रुव्हल (Approval) साठी दिनांक २१.१०.२०१३ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती. संस्थेनी सदर योजनेचे अर्ज संबंधित विभागीय कार्यालयाकडे **दिनांक २५.१०.२०१३ पर्यंत विना विलंब सादर करावयाचे आहेत.** वरील नमूद मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही प्रकारे विचारात घेऊ नयेत. याबाबत आपल्या विभागीय कार्यालयाच्या स्तरावर संबंधित संस्थांना कळविण्यात यावे. सर्व संस्थाकडून प्राप्त झालेल्या अर्जांची विभागीय कार्यालय स्तरावर प्राथमिक छानणी करुन सवलतीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी संगणक प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या विवरणपत्रात भरुन **दि. ३० ऑक्टोबर २०१३ पर्यंत** अर्थसंकल्पीय अंदाजासाठी या संचालनालयास सादर करण्यात यावी.

( डॉ. सुभाष महाजन )

प्र. संचालक

तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

**प्रत:- माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सादर**

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ महाराष्ट्र राज्य, मुंबई.

\\192.168.1.9\Desk15\Kadam EBC 2012-13\ebc letter ro.doc